# ॥ अस्तित्व ॥

## प्रल्हादराय कागझी इन्स्टिट्यूट फॉर हॅन्डिकॅप्ड

प्लॉट नं. ८, फेज – १, स्टेट बँक रोड, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी : ९८३३५५६९८१
E-mail : astitvatrust81@gmail.com
Visit us at : http//www.astitvaschool.co.in

स्थापना १९८१



# ४४ वा वार्षिक अहवाल

# २०२४ – २०२५

*** नोंदणी ***

**दि सोसायटी रजि.ॲक्ट. १८६० एमएएच/९२२/ठाणे**
**दि बॉम्बे पब्लिक ट्रस्टस् ॲक्ट १९५० एफ ८२९/ठाणे**
**देणगीदारांना आयकर अधिनियम ८० जी (५) नुसार सवलत उपलब्ध**

Income Tax Exemption Certificate Under 80 G : II Clause (i) of first proviso to sub-section (5) of section 80 G dt.24.9.2021 valid from AY 2022.23 to AY 2026.27

स्वातंत्र्य दिन - दि.१५ ऑगस्ट २०२४




ध्वजारोहण करतांना प्रमुख पाहुणे विद्याविभुषित डॉ.श्रीमती नंदा मेश्राम.
सोबत संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही.आडकर व अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते



स्वातंत्र्य दिनी विद्यार्थी कवायत सादर करतांना

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मतिमंद, मुकबधिरांसाठी शाळा, संरक्षित कर्मशाळा, कर्मशाळा, मतिमंदांसाठी वसतिगृह आणि वृध्दाश्रम चालविणाऱ्या डोंबिवली येथील अस्तित्व या संस्थेची आर्थिक वर्ष २०२४-२०२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १५/०८/२०२५ रोजी ११.०० वाजता संस्थेच्या वास्तूत आयोजित केली आहे. तरी आपण सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील कामकाज

१. दिनांक २९/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे

२. संस्थेचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा अहवाल वाचून लेखा विवरणपत्रे व परिक्षित अहवाल स्वीकृत करणे

३. २०२५-२०२६ या वर्षाकरिता सनदी लेखापालांची नियुक्ती करणे व मेहनतांना ठरविणे.

४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे

दिनांक : १४/०७/२०२५

**राधिका गुप्ते**

अध्यक्ष

सूचना :

सभेच्या नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाच्या अवधीत जर आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सदर सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब केलेली सभा, त्याच ठिकाणी, उपरोक्त काम काजाकरिता अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. याची सभासदांनी नोंद घ्यावी.

संस्थेचा वर्धापन दि.६ सप्टेंबर २०२४




कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे उद्यान अधिक्षक
श्री.महेश देशपांडे व इवॉनिक कॅटलिस्ट कंपनीचे अधिकारी
श्री.मुरली अययर यांचे स्वागत करताना संस्थापक अध्यक्ष
डॉ.एस.व्ही. आडकर व अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते



वर्धापन दिनी केक कापतांना प्रमुख पाहुणे व संस्थेचे विश्वस्त




**दि.९ डिसेंबर २०२४ रोजी नासिओ तर्फेLate N.D. Diwan Memorial Award for Professional Worker हे अॅवॉर्ड मतिमंद विभागातील मानसशास्त्रज्ञ सौ.ज्योती कुलकर्णी यांना प्रदान**



naseoh
Synergizing abilities to create a WORLD of difference

To

MRS. JYOTI SANDEEP KULKARNI

Who, is a Clinical Psychologist at
ASTITVA PRAHLADRAI KAGZI INSTITUTE FOR HANDICAPPED, Dombivli;

Who, has done Masters in Clinical Psychology, Post Graduation diploma in Parental Counselling, Certificate Course in Autism Assessment & Certificate course in ABA Therapy;

Who, has conducted IQ testing for intellectually disabled children, administering Autism Diagnostic Assessment therapy sessions to develop cognitive ability and improve perception, observation skills and resolve behaviour issues, parental counselling; conducted sessions for students to create awareness regarding good touch and bad touch. Training programs for teachers to identify diffrently abled children & guide parents accordingly; who, during Covid pandemic on the request of Rehabilitation Council of India (RCI) has done free telephonic counselling & also provided training to teachers and therapists as a resource person in Continued Rehabilitation Education (CRE) programs under the guidelines of RCI;

Who, has won several awards for her multifaceted contributions for the Rehabilitation of Intellectually Challenged Children such as Appreciation Award by Rotary Club of Midtown Dombivli, Appreciation Award from Brahman Mahasangh Dombivli, Nation Builder Award from Rotary Club of Dombivli East.

IN GREAT APPRECIATION OF
YOUR DEDICATED SERVICES IN THE FIELD
OF REHABILITATION OF PERSONS WITH DISABILITIES
AND
YOUR OUTSTANDING ACHIEVEMENTS AS A PROFESSIONAL
OF HIGHEST ORDER FOR 3 DECADES,
THE NATIONAL SOCIETY FOR EQUAL OPPORTUNITIES FOR THE HANDICAPPED, INDIA
has pleasure in AWARDING You
LATE SHRI N. D. DIWAN MEMORIAL AWARD 2024

Given at Mumbai
On Monday, 9th December, 2024

Hansa B. Mehta.
(Hansa B. Mehta)
PRESIDENT

**सर्टिफिकेट**

# अस्तित्व

## कार्यकारिणी मंडळ २०२४-२०२५

| अ.क्र | नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. एस.व्ही.आडकर | संस्थापक अध्यक्ष-विश्वस्त |
| २ | श्रीमती राधिका गुप्ते | अध्यक्ष |
| ३ | श्री. मनोज प्रधान | सचिव |
| ४ | श्री. प्रविण कुबेर | खजिनदार |
| ५ | डॉ. प्रमोद बाहेकर | सहसचिव |
| ६ | श्री. डी.एस.भामरे | विश्वस्त |
| ७ | श्री. अविनाश परांजपे | विश्वस्त |
| ८ | श्री. माधव सिंग | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| ९ | श्री. किरणकुमार पाटील | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| १० | श्री.सुहास आंबेकर | सभासद, कार्यकारिणी मंडळ |
| ११ | ॲड. राजकुमार तिवारी | विशेष निमंत्रित |

# वार्षिक अहवाल २०२४ - २०२५

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सन २०२४-२०२५ या वर्षाचा ४४ वा वार्षिक अहवाल तसेच मा. सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेली लेखाविवरण पत्रे व परिक्षित अहवाल आपणांसमोर सादर करतांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

अहवाल वर्षात संस्थेतील सहाही विभागांमध्ये मिळून एकूण २८१ लाभार्थी संख्या होती. कर्मचारी वर्ग- अनुदानित २५ मानद १७ व प्रशासकीय मान्यता प्रलंबित १३ असा एकूण ५५ होता.

अहवाल वर्षात डॉ. शोभा पाटील यांनी मानद वैदयकीय अधिकारी म्हणून संस्थेतील सर्व विभागांतील विदयार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली.

अहवाल वर्षात विविध महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, रक्षाबंधन, दहीहंडी, श्रावणी शुक्रवार, दसरा, भोंडला, दिवाळी इ. अशा सर्व सणांचा आनंद विदयार्थ्यांनी घेतला.

विदयार्थ्यांच्या व पालकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी शैक्षणिक वर्षात वेळोवेळी पालक सभा घेण्यात येतात. याशिवाय विदयार्थ्याचे वैयक्तिक आरोग्य व इतर बाबी संदर्भात पालकांशी चर्चा करण्यात येते.

दि. १३ जून २०२४ रोजी उन्हाळी सुटटीनंतर विदयार्थी शाळेत आले. विदयार्थ्यांच्या स्वागतासाठी तोरण बांधले व रांगोळी काढण्यात आली. तसेच चॉकलेट व स्पोर्टस ड्रेस विदयार्थ्यांना देऊन नविन शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यात आले.

दि. २१ जून २०२४ रोजी संस्थेत योगदिन साजरा करण्यात आला.

दि. ३१ जुलै २०२४ रोजी गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली तर्फे मतिमंद विभागातील ५ विदयार्थ्यांना प्रति रू.८००/- व ५ विदयार्थ्यांना प्रति रू.९००/- अशी एकूण रू. ८५००/- तसेच मूकबधिर विभागातील ५ विदयार्थ्यांना प्रति रू.८००/- व ५ विदयार्थ्यांना प्रत्येकी रु ९००/- असे एकूण रू.८५००/- असे शैक्षणिक सहाय्य म्हणून आर्थिक मदत मिळाली.

दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी ग्रामीण रुग्णालय, गोवेली तर्फे संस्थेतील विदयार्थ्यांसाठी संस्थेत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. मतिमंद व मूकबधिर विभागातील मिळून एकूण १७१ विदयार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

दरवर्षीप्रमाणे दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. अहवालवर्षात विदयाविभूषित डॉ. श्रीमती नंदा मेश्राम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे हितचिंतक व लेखक श्री. रमाकांत जाधव पत्नीसह उपस्थित होते.

दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचा ४३ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमूख पाहुणे म्हणून कल्याण डोंबिवली म्युनिसिपल कॉर्पोरेशन च्या आयुक्त मा. इंदुराणी जाखड मॅडम यांना आमंत्रित केले होते, परंतु त्यांना काही कारणास्तव येणे शक्य नसल्याने त्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी उद्यान अधिक्षक श्री. महेश देशपांडे यांस पाठविले. यावेळी Evonik Catalysts कंपनीतील अधिकारी श्री. मुरली अय्यर हे ही उपस्थित होते.

दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी संस्थेत आनंदमेळा आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. विनय भोळे उपस्थित होते, ह्यावेळी आनंदमेळयात एकूण ४२ जणांचे (पालकांचे, विभागांचे) स्टॉल होते.

दि. ५ जानेवारी २०२५ रोजी शिक्षक व पालकांसाठी शैक्षणिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी १.सुप्रसिध्द वक्ते अर्थतज्ञ डॉ. उदय निरगुडकर २. डॉ. आसावरी शिंदे- अपंगांच्या योजना व सवलती. ३. ऑडिओलॉजिस्ट डॉ. शंतनु सौंदणकर - कर्णबधिरांच्या सध्याच्या प्रगतीबाबत ४. सौ. तन्मयी सौंदणकर- ॲनिमल थेरपी ५. श्रीमती पूर्वा घोटकर - म्युझिक थेरपी या मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

दि.२६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून उदयोजक श्री. भरत तावरे व Aurionpro Solutions Pvt. Ltd. चे Company Secretary श्री. निनाद केळकर व Treasure Solutions कंपनीचे Company Secretary श्री शार्दुल इनामदार उपस्थित होते.

अहवाल वर्षात Aurion Pro Solution कंपनीचे Secretary श्री. निनाद केळकर व Treasure Solutions कंपनीचे Secretary श्री. शार्दूल इनामदार यांच्या पुढाकाराने CSR Fund मधून संस्थेतील ग्राऊंडवर Green Grass Carpet बसविण्यात आले.

दि.२६ व २७ जानेवारी २०२५ रोजीSitsons India Co. तर्फे संस्थेतील सर्व विदयार्थी, कर्मचारी, विश्वस्त यांची मोफत डोळयांची तपासणी झाली व चष्मे वाटप केले.

दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेत स्नेहसंमेलन झाले. सर्व विभागांतील आदर्श विदयार्थ्यांना गौरविण्यात आले. सर्व विभांगातील विदयार्थ्यांचा नृत्यामध्ये सहभाग होता. योवळी उपस्थित सर्व पालक, विदयार्थी, कर्मचारी, विश्वस्त यांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी, अस्तित्व संस्थेचा गेल्या ४३ वर्षाचा इतिहास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश आडकर यांनी अथक परिश्रमाने संकलित करुन लिहिला. त्या अस्तित्व पुस्तिकेचे प्रकाशन माजी खासदार आमदार मा. श्री. जगन्नाथ पाटील साहेब यांच्या हस्ते या दिवशी करण्यात आले. पुस्तक प्रकाशनाच्या दिवशी डॉ. सुरेश आडकर यांचा ८० वा वाढदिवस सर्व विश्वस्त, कर्मचारी , हितचिंतक, विदयार्थी यांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला.

अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यालयाचे अदययावत स्वरुपाचे renovation करण्यात आले. त्याचे उदघाटन

गुढीपाडव्याच्या दिवशी दि. ३० मार्च २०२५ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यालयातील मंदिरासाठी नविन गणपतीची मूर्ती आणून पूजा करण्यात आली. सदर दिवशी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एस. व्ही. आडकर, अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते, सचिव श्री. मनोज प्रधान व संस्थेतील कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

अहवाल वर्षात विधानसभा निवडणूकीच्या डयुटीसाठी संस्थेतील कर्मचारी वेळोवेळी विविध ठिकाणी प्रशिक्षण व निवडणूकीच्या दिवशी उपस्थित होते.

अहवाल वर्षात रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पूर्व च्या वतीने अन्नपूर्णा प्रोजेक्ट अंतर्गत सर्व विदयार्थ्यांना आणि कर्मचा-यांना दोन वेळा जेवण देण्यात आले.

संस्थेच्या तिनही अनुदानित शाळांचे वार्षिक मुल्यनिर्धारण होत असते. मतिमंद व मूक बधिर विभागाची वेतनेतर अनुदान थकबाकी शासनाकडून मे २०२५ मध्ये काही प्रमाणात मिळाली. संरक्षित कर्मशाळेची वेतनेतर थकबाकी अजूनही अप्राप्त आहे. उर्वरित सर्व थकबाकीचा वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा होत असतो.

**विशेष बाब-** दिव्यांग मंत्रालय, मुंबई येथून संस्थेतील अनुदानित तीनही विभागातील १३ रिक्त पदांना पदभरतीसाठी NOC मिळाली. तदनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन दि.२७ व २८ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेत मुलाखती घेण्यात आल्या त्यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. संजय बागुल साहेब उपस्थित होते. निवड झालेल्या उमेदवारांना दि. ३ ऑक्टोबर २०२४ पासून रुजू करण्यात आले. शासनाकडे त्यांच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले. वेळोवेळी सतत पाठपुरावा करुनही अदयाप त्यांच्या पदांची मंजुरी प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांना शासनाकडून वेतन सुरु झालेले नाही.

दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सीटी आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे लेक सिटी व रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विदयमाने, मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणा-या संस्थामध्ये आपल्या अस्तित्व संस्थेला सन्मानित करण्यात आले.

दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी नासिओ तर्फे Late N.D. Diwan Memorial Award for Professional Worker हे ॲवॉर्ड मतिमंद विभागातील मानसशास्त्रज्ञ सौ. ज्योती कुलकर्णी यांना मिळाले.

**भेट-** दरवर्षी विविध शाळा, कॉलेज चे विदयार्थी, सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी अनेक मान्यवर, हितचिंतक आपल्या संस्थेस भेट देण्यासाठी येत असतात.

दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी ''प्रथम'' संस्थेच्या प्रतिनिधींनी राज्यातील दिव्यांगाच्या उपक्रमांबाबत संस्थेला भेट दिली.

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी ''वाचा फाऊंडेशन'' च्या विदयार्थ्यांनी संस्थेत भेट दिली. दि. १९ मार्च २०२५ रोजी जिल्हा समाज कल्याण अधिकारी मा.सौ. उज्वला सपकाळे मॅडम यांनी शाळेला भेट दिली व कौतूक केले.

आनंद मेळा दि.२८ डिसेंबर २०२४



आनंद मेळ्याचे उद्‌घाटन करतांना प्रा.डॉ.विनय भोळे सोबत संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर, अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते, सचिव श्री.मनोज प्रधान, मुख्याध्यापक श्री.पद्‌माकर दाभाडे



आनंद मेळ्यात विविध स्टॉलची पाहणी करतांना पाहुणे प्रा. डॉ. विनय भोळे व संस्थेचे विश्वस्त

## शैक्षणिक शिबिर - दि.५ जानेवारी २०२५



शैक्षणिक शिबिरात प्रमुख पाहुणे सुप्रसिध्द वक्ते, अर्थतज्ञ डॉ.उदय निरगुडकर यांचे संस्थेत स्वागत



शिबिराचे उद्घाटन दिप प्रज्वलनाने करतांना डॉ.उदय निरगुडकर
सोबत अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते

DEEDS संस्थेतून Basic English Literacy Course चालू ठेवण्या बाबत अस्तित्व मुकबधिर प्रबोधिनी विभागात दि. १.४.२०२४ ते १.४.२०२५ या कालावधीत २ शिक्षक दुपारच्या वेळेत येत होते.

या व्यतिरिक्त कलानी कॉलेज उल्हासनगर, सेंट झेवियर्स कॉलेज, के.व्ही. पेंढारकर कॉलेज, मॉडेल कॉलेज, यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठ नाशिकच्या विदयार्थ्यांनी संस्थेत भेट दिली.

**सहल-** दि. २० डिसेंबर २०२४ रोजी शाळेची वार्षिक सहल मॉन्टेरिया व्हिलेज, नेरळ येथे गेली होती. हयात एकूण १४९ विदयार्थी व २० कर्मचारी यांचा सहभाग होता.

**विविध स्पर्धा -** संस्थेतील विदयार्थी विविध ठिकाणी होणा-या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. दि. २८ जुलै २०२४ रोजी शिवाई बालक मंदिर मॅरेथॉन स्पर्धेत मतिमंद विभागाला ३ व मुकबधिर विभागाला २ बक्षीसे मिळाली.

दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त संस्थेत क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. मतिमंद विभागातील ६४ विदयार्थी सहभागी झाले, मूकबधिर विभागातील २४ विदयार्थी सहभागी झाले, संरक्षित कर्मशाळेतून १४ विदयार्थी सहभागी झाले.

दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी पाटकर ट्रस्ट तर्फे झालेल्या क्रिडा स्पर्धेत मतिमंद विभागाला १० गोल्ड, ९ सिल्वर, ९ ब्राँझ पदके मिळाली. मूकबधिर विभागाला १५ गोल्ड, १३ सिल्वर, ७ ब्राँझ पदके मिळाली. तर संरक्षित कर्मशाळेला ३ गोल्ड, २ सिल्वर, २ ब्रॉझ पदके मिळाली. व उत्कृष्ठ संचलनाचे बक्षिस आपल्या संस्थेला मिळाले. सर्व विदयार्थ्यांना पाटकर ट्रस्ट तर्फे बूट, टीशर्ट देण्यात आले.

जानेवारी महिन्यात सर्व विभागांतील विदयार्थ्यांच्या वार्षिक शालेय क्रिडास्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या विदयार्थ्यांना प्रजासत्ताक दिनी बक्षिसे देण्यात आली.

दि. १९ मार्च २०२५ रोजी जिल्हा समाज कल्याण ठाणे हयांच्यातर्फे जिल्हास्तरीय अपंगांच्या क्रिडास्पर्धा डोंबिवली जिमखाना येथे घेण्यात आल्या. यात मतिमंद विभागाला ५ गोल्ड, ५ सिल्वर, ४ ब्राँझ पदके मिळाली. मूकबधिर विभागाला २ गोल्ड, ४ ब्राँझ पदके मिळाली. व संरक्षित कर्मशाळेला १ गोल्ड, १ सिल्वर, १ ब्राँझ पदक मिळाले. यावेळी डोंबिवली जिमखाना मध्ये जेवण नाश्ता याची सोय होऊ शकत नसल्यामुळे मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सकपाळे मॅडम यांनी संस्थेच्या अध्यक्ष राधिका गुप्ते यांना विनंती केली की अस्तित्व संस्थेची जागा, ठाणे जिल्हयातील सर्व शाळांतील विदयार्थी, शिक्षक यांच्या नाश्ता, जेवणाची सोय व्हावी म्हणून देण्यात यावी. त्यानुसार आपल्या संस्थेची जागा सर्व शाळांतील विदयार्थी, शिक्षक, पालक, जिल्हा समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी वर्ग यांच्या नाश्ता, जेवणासाठी देण्यात आली. त्यावेळी मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सकपाळे मॅडमही संस्थेत उपस्थित होत्या.

**मतिमंद विभाग**

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षांच्या सुरुवातीला पटावर १३४ विदयार्थी होते. कर्मचारी- ११ कर्मचारी शासनमान्य व ०९ कर्मचारी प्रशासकीय मान्यता प्रलंबित असे एकूण २० कर्मचारी अहवाल वर्षात कार्यरत होते. (शासकीय-मुख्याध्यापक-१, मानसशास्त्रज्ञ-१, स्पीच थेरपिस्ट-१, विशेष शिक्षक- २, कलाशिक्षक २, लिपिक-१, मदतनीस-२, केअरटेकर-१) (प्रशासकीय मान्यता प्रलंबित विशेष शिक्षक -७, संगीत शिक्षक-१, केअरटेकर-१)

दि. २ एप्रिल २०२४ रोजी जागतिक ऑटिझम अवेअरनेस दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थी व पालकांसाठी Activity घेण्यात आली.

NIOS प्रथम अंतर्गत ओरिएन्टेशन साठी शिक्षिका हसुमती साळुंखे मुंबई येथे गेल्या होत्या.

दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी बालकल्याण संस्था, पुणे येथे प्रारंभिक ते विशारद अभ्यासक्रमाच्या पुस्तक प्रकाशन सोहळयास शिक्षिका हसुमती साळुंखे उपस्थित होत्या.

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी गोरेगाव स्पोर्टस क्लब येथे टेबल टेनिस ट्रायल साठी ५ विदयार्थी व शिक्षक गणेश कुमावत गेले होते.

दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी स्पेशल ऑलिंपिक भारत- महाराष्ट्र राज्य युनोफाईड चॅम्पियनशीप, लवासा - पुणे येथे दि ९ ते ११ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत स्पर्धा पार पडल्या. यात दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत कु. क्षितिज यशवंतराव यास सुवर्णपदक प्राप्त झाले.

दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रथम अंतर्गत वार्षिक परिक्षेला सुरुवात झाली. यात आपल्या परिक्षाकेंद्रात खालीलप्रमाणे विदयार्थी परिक्षेला बसले होते.

| | |
|---|---|
| १. आस्था हेल्थ केअर सेंटर | १७ विद्यार्थी |
| २. लुनार अपंग स्कूल | ११ विद्यार्थी |
| ३. संकल्प स्कूल | ०१ विद्यार्थी |
| ४. प्रथम | ०३ विद्यार्थी |
| ५. अस्तित्व शाळा | ०६ विद्यार्थी |
| **एकूण** | **३८** विद्यार्थी |

दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रोजेक्ट दिशा च्या स्नेहल बैईत मॅडम यांनी शाळेत येऊन ४ वर्गांचे निरिक्षण केले व आपल्या कामाचे कौतुक केले.

दि.४ मार्च २०२५ रोजी नेहरु सेंटर, वरळी येथे १० विदयार्थी व शिक्षक गणेश कुमावत गेले होते. यात श्रेयस मोहिते यास प्रथम, शंतनु बोबडे यास दिवतीय व साईसरण अय्यर, सामर्थ्य पाठारे, आयुष सालपे यांना उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

**मूकबधिर विभाग -**

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात पटावर ६३ विदयार्थी होते. कर्मचारी- १० कर्मचारी शासनमान्य व ३ कर्मचारी प्रशासकीय मान्यता प्रलंबित असे एकूण १३ कर्मचारी अहवाल वर्षात कार्यरत होते. (शासकीय - विशेष शिक्षक-५. कलाशिक्षक - १. लेखापाल -१, शिपाई -१, वर्गसहायक १, केअरटेकर- १ (प्रशासकीय मान्यता प्रलंबित विशेष शिक्षक -२, कला शिक्षक-१.)

दि.१२ जून २०२४ रोजी कल्याण पंचायत समिती तर्फे विभागाला इ. १ ली ते इ.७ वी पर्यंतची शालेय पाठयपुस्तके मिळाली.

अहवाल वर्षात माध्यमिक शालांत परिक्षेचा निकाल लागला. विभागातून १५ विदयार्थी १० वी च्या परिक्षेस बसले होते . १००% निकाल लागला व सिध्दी बोनवटे हीला ७८ % गूण मिळवून ती विभागात प्रथम आली.

दि. १८ जानेवारी २०२५ रोजी जोश फाऊंडेशन, विलेपारले आयोजित नृत्य स्पर्धेत ८ विदयार्थिनीनी भाग घेतला.सहभागाबददल रु१३०००/- रक्कम मिळाली. ही विदयार्थ्यांना बक्षिस म्हणून देण्यात आली.

दि.१२ मार्च २०२५ रोजी जोश फाउंडेशन, विलेपारले यांच्यातर्फे ४६ विदयार्थ्यांना मोफत श्रवणयंत्रे मिळाली.

**संरक्षित कर्मशाळा-**

अस्तित्व मतिमंद मुलांच्या संरक्षित कर्मशाळेमध्ये हस्तव्यवसाय, फाईल बॉक्स, प्राथमिक सुतारकाम कौशल्ये, भरतकाम कौशल्ये, ज्वेलरी मेकींग कौशल्ये, मोल्डींग कौशल्ये या विविध गटामध्ये ४२ लाभार्थी आहेत.

विभागात शासनमान्य ४ कर्मचारी व प्रशासकीय मान्यता प्रलंबित १ कर्मचारी असे एकूण ५ कर्मचारी अहवाल वर्षांत कार्यरत होते. १ निदेशक, १ लिपिक, १ मदतनीस, १ शिपाई. व (प्रशासकीय मान्यता प्रलंबित १ निदेशक )

ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२ लाखापेक्षा कमी असते त्या विद्यार्थ्यांना एका वर्षासाठी प्रति महिना रु.२५००/ पेन्शन मिळते. विभागातील ४ विद्यार्थ्यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून अशाप्रकारची मदत अहवाल वर्षात मिळाली.

शासनाकडून संरक्षित कर्मशाळेमधील विदयार्थ्यांना एका वर्षासाठी रु. ३६००/- शिष्यवृत्ती मिळते. फेब्रुवारी २०२५ मध्ये काही विदयार्थ्यांना सन २०२२-२३, २०२३-२४ या वर्षासाठी शिष्यवृत्ती मिळाली.

संरक्षित कर्मशाळेमधील कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाची फरकाची पूर्ण रक्कम तसेच निवृत्त कर्मचा-यांची सातव्या वेतन आयोगाची रक्कम शासनाकडून जुलै २०२४ मध्ये मिळाली.

**कर्मशाळा -**

विभागात एकूण ३१ विदयार्थी आहेत. त्यापैकी १६ विदयार्थी वसतिगृहातील आहेत. सौ. मुक्ता खामकर, श्रीमती सुरेखा गवारे या वसतिगृहाच्या रेक्टर यांनी सकाळी १० ते ४ यावेळेत वर्कशॉपचे काम जबाबदारीने सांभाळले. तसेच १ केअरटेकर स.१० ते ५ या वेळात कार्यरत आहे. कर्मशाळेत मुखशुध्दी, गोडा मसाला, विविध पीठे, मेतकुट, हळद, तिखट, विविध चटण्या, थालिपीठ भाजणी, कागदी, कापडी पिशव्या, ॲप्रन इत्यादी उत्पादने विदयार्थ्याकडून तयार केली जातात. व कु. प्रियांका डोगरा वसतिगृह केअरटेकर यांनी सकाळी १०.०० ते १२.०० व संध्याकाळी ०४.०० ते ७.०० विक्री केंद्र सांभाळले. कर्मशाळेतील विदयार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करुन रु १,१२,१०३/- मिळाले.

कर्मशाळेतील सर्व विदयार्थ्याना त्यांच्या कौशल्यानुसार संस्थेतर्फे पाठ्यवेतन त्यांच्या अ, ब, क, ड या ग्रेडनुसार दिवाळी भेट म्हणून दिवाळीत व मार्च महिन्यात देण्यात येते. अहवाल वर्षात कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, ॲप्रन, विविध भाजण्या, आंबोळीपीठ, हळद, तिखट, गोडा मसाला ह्या पदार्थांना विशेष मागणी होती, तसेच सिझनमध्ये चिवडा, विविध चटण्या ह्यांची विक्री जास्त झाली.

अहवाल वर्षात आपल्या कर्मशाळेला आगरी महोत्सवामध्ये विक्रीसाठी मोफत स्टॉल मिळाला, तसेच डोबिवली जिमखाना येथे होणा-या उत्सव मधेही मोफत स्टॉल मिळाला. तेथे वसतिगृहातील रेक्टर श्रीमती सुरेखा गवारे व केअरटेकर प्रियंका डोगरा जाऊन जबाबदारीने काम सांभाळले. त्यावेळी आपल्या वस्तूंची मोठया प्रमाणात तिथे विक्री झाली.

**वसतिगृह -**

अहवाल वर्षाच्या सुरूवातीस वसतिगृहात २० मुले व ११ मुली असे ३१ विदयार्थी होते, वसतिगृहात कायम वास्तव्यास असलेले २ रेक्टर, २ जेन्ट्स केअरटेकर, १ लेडी केअरटेकर, १ किचन स्टाफ आहेत.

तसेच १ लिपिक, १ लेडी केअरटेकर, १ किचन स्टाफ, भांडीवाली, स्वीपर हे दिवसभरासाठी स्टाफ आहे. तसेच रात्रीसाठी १ वॉचमन आहे.

अहवाल वर्षात वसतिगृहात वॉटर प्रुफिंग, रंगकाम झाले. त्यामुळे आता वसतिगृह सर्व सोयी सुविधांनी सुशोभित झाले आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वसतिगृहातील विदयार्थ्याचे वाढदिवस साजरे करण्यात आले व विविध सण विदयार्थ्यांनी साजरे करुन आनंद व्यक्त केला. वसतिगृहात नवीन प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यास एक महिना निरीक्षणासाठी प्रवेश दिला जातो व काही समस्या नसेल तर तदनंतर कायम स्वरुपी प्रवेश देण्यात येतो.



शैक्षणिक शिबिरात वक्त्या डॉ.आसावरी शिंदे
यांना संस्थेचे स्मृतीचिन्ह देतांना
डॉ.उदय निरगुडकर व संस्थेचे विश्वस्त




शैक्षणिक शिबिरात ऑडिओलॉजिस्ट
डॉ.शंतनु सौंदणकर
यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना
अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते



शैक्षणिक शिबिरात सौ.तन्मई सौंदणकर
यांना स्मृतिचिन्ह देतांना
अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते



शैक्षणिक शिबिरात श्रीमती पूर्वा घोटकर
यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना
अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते

## प्रजासत्ताक दिन – दि.२६ जानेवारी २०२५



प्रजासत्ताक दिनी पाहुण्यांना सलामी देतांना
मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांचे बँड पथक



प्रजासत्ताक दिनी कवायत सादर करतांना मूकबधिर प्रबोधिनीतील विद्यार्थी



प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुणे श्री.निनाद केळकर
यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतांना
संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही.आडकर



प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन करतांना
प्रमुख पाहुणे सोहन इंडस्ट्रिज प्रा.लि. चे
उद्योजक श्री.भरत तावरे व
**Aurion Pro Solution Pvt. Ltd.**
चे कंपनी सेक्रेटरी श्री.निनाद केळकर व
संस्थेचे विश्वस्त

## नेत्र तपासणी शिबिर दि.२६ जानेवारी २०२५




**सिटसन कंपनी, डोंबिवली तर्फे नेत्र तपासणी शिबिरात पुष्पगुच्छ देवून स्वागत करतांना संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर व अस्तित्व संस्थेचे विश्वस्त आणि सिटसन कंपनीचे प्रोप्रायटर श्री.दिलिप भामरे**



**नेत्र तपासणी शिबिरात तपासणी करतांना श्री.निनाद केळकर व संस्थेचे विश्वस्त**

## वार्षिक स्नेहसंमेलन – दि.८ फेब्रुवारी २०२५



संस्थेच्या विश्वस्तांना सलामी देतांना
मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांचे बँड पथक



मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांचे बँड पथक




मतिमंद शाळेतील विद्यार्थी व विश्वस्त आणि
कर्मचारी वर्ग




मूकबधिर प्रबोधिनी शाळेतील
विद्यार्थी व विश्वस्त आणि कर्मचारी वर्ग

संस्थेला Building Completion Certificate मिळाल्याने अहवाल वर्षात लिफट चे काम पूर्ण झाले. वसतिगृहातील विदयार्थी व त्यांच्या पालकांसाठी चांगली सोय झाली.

डोंबिवलीतील अंडयांचा व्यवसाय करणारे श्री. सुनील शेटये हे दरमहिन्यास १०० अंडी मोफत वसतिगृहातील विदयार्थ्यांसाठी देतात.

डॉ. शोभा पाटील या मानद वैदयकीय अधिकारी वसतिगृहातील विदयाथ्र्यांची आठवडयातून दोन वेळा तपासणी करतात. तसेच वेळोवेळी कधीही अडचण आल्यास ताबडतोब संस्थेत येऊन विदयार्थ्यांची तपासणी करतात.

वसतिगृहातील विदयार्थ्यांसाठी दर मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता श्रीमती विशाखा जोशी संस्थेत येऊन भजन घेतात.

वसतिगृहातील विदयार्थ्यांसाठी दर शुक्रवारी दुपारी २.३० वाजता श्रीमती विजयालक्ष्मी संस्थेत येऊन योगा, नृत्य घेतात.

अहवाल वर्षात ८ विदयार्थ्यांचे पालकांनी स्वेच्छेने प्रवेश रद्द केले. व ३ विदयार्थ्यांनी नवीन प्रवेश घेतले.

मार्च अखेरीस वसतिगृहात १९ मुले व ७ मुली असे २६ विद्यार्थी आहेत.

वसतिगृहास अहवाल वर्षात बऱ्याच देणगीदारांनी धान्य देणगी म्हणून दिले. अभिजित गरुड या विदयार्थ्यांच्या आई श्रीमती उल्का गरुड यांनी विदयार्थ्यांसाठी २ महिने ताक डोनेशन म्हणून दिले.

**सन्मान वृध्दाश्रम**

अदययावत सोयीसुविधांनीयुक्त अशा वृध्दाश्रमात १ मदतनीस दिवसभरासाठी सकाळी ८ ते रात्री ८ नेमण्यात आला आहे. सध्या वृध्दाश्रमातील पहिल्या प्रवेशित श्रीमती अंजली आवळस्कर वास्तव्यास आहेत. त्यांच्या जेवणाखाण्याची सोय आपल्या वसतिगृहातील किचनमधून केली जाते. आणि त्यांना ते आवडतही आहे. संस्थेच्या वृध्दाश्रमाची माहिती विविध माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

संस्थेतील सर्व विभागात प्रवेश घेण्यासाठी खालील दस्ताऐवज आवश्यक असतात.

१. शासकीय अपंगत्वाचा दाखला

२. रेशनकार्ड

३. जन्म तारखेचा दाखला

४. वैदयकीय उपचारांचा तपशील

५. आधार कार्ड

६. रक्तगट

## योजना

संस्थेला गेली ४४ वर्षे समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी आजपर्यंत मदतीचा हात पुढे केला आहे. यातूनच आपणांस संस्थेची आजची प्रगती दिसत आहे. आजही विविध स्वरूपात संस्थेला देणगी मिळत असते. यासाठी संस्थेच्या खालील योजना आहेत.

आपल्या परिवारातील वाढदिवसानिमित्त अथवा प्रिय व्यक्तींच्या स्मृतीदिनानिमित्त किंवा प्रासंगिक कारणाने खालील योजनेचा विचार करू शकता :वसतिगृहातील साधारण ४५ व्यक्तींसाठी :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एकवेळचा नाश्ता देणगी मुल्य | - | रु. ३०००/- |
| २. | साधे जेवण | - | रु. ४०००/- |
| २. | एक वेळचे जेवण (शाकाहारी) गोडाचे जेवण | - | रु. ६०००/- |

**नामांकित कंपनीची बिस्किटे, चॉकलेट व फळे खाऊ म्हणून स्वीकारले जातात.**

**रेडिमेड खादय पदार्थ स्वीकारले जात नाहीत.**

पुढीलप्रमाणे देणगी दिल्यास रुम किंवा हॉलला नाव देण्यात येईल :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रुम | - | रु. १,००,०००/- |
| २. | मिनी हॉल | - | रु. ५,००,०००/- |
| ३. | डायनिंग हॉल | - | रु. १०,००,०००/- |

वस्तुरुपात देणगी :

संस्थेस विविध वस्तू, धान्य, शैक्षणिक साधने, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादींची आवश्यकता भासते. नवीन वस्तूरूपातील देणग्या देण्याची इच्छा असल्यास संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते यांच्याशी विचार विनिमय केल्यास संस्थेला आवश्यक असलेल्या वस्तू देता येतील जेणे करून त्यांचा योग्य उपयोग होईल. वापरलेले कपडे आम्ही स्वीकारत नाही.

**सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खालील व्यक्तींनी वस्तुरूपात देणगी दिली**

| अक्र | नांव | तपशील |
|---|---|---|
| १ | श्री.अरविंद ढवळे, डोंबिवली | जूना एअर कुलर |
| २ | श्री.सुरेंद्र विचारे, डोंबिवली | जुन्या सागवानी खुर्च्या |
| ३ | श्रीमती सायली माळवे | २ पंखे, ट्युबलाईटस्, जुना सोफा |
| ४ | श्री.पवार | २ पंखे |
| ५ | इनरव्हिल क्लब, डोंबिवली | ६ पंखे |
| ६. | सौ.अपर्णा कुलकर्णी | जुनी घरघंटी |
| ७. | Universal Sompologic Ltd.अंधेरी | नविन १० पट्टीसहित ट्युबलाईट |
| ८. | श्री. विपुल गोपानी | ३० नग बेडशीट व पिलोकव्हर |
| ९. | सौ.नंदिनी वेल्हणकर | ३० नग सोलापूरी चादरी, ३० नग सिंगल बेडशिट |
| १०. | श्री.महेंद्र सावंत | व्हॅक्यूम क्लीनर गार्डनिंगसाठी |

वरील देणगीदारांची संस्था अत्यंत आभारी आहे. तसेच अहवाल वर्षात काही पालक व देणगीदारांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ, धान्य, भेटवस्तूंचे वाटप केले त्याबद्दल संस्था अत्यंत आभारी आहे.

**श्रद्धांजली**

संस्थेला अनेक आप्तस्वकीयांचा वियोग अत्यंत जड अंत:करणाने सहन करावा लागला.

- दि.२३ एप्रिल २०२४ रोजी डॉ.शोभा पाटील यांच्या आईचे दु:खद निधन झाले.
- दि.१७ मे २०२४ रोजी वसतिगृहातील विदयार्थिनी मंगला सांडव हीचे दु:खद निधन झाले.
- दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचे सहसचिव डॉ.प्रमोद बाहेकर यांच्या वडिलांचे दत्तोपंत बाहेकर यांचे दु:खद निधन झाले.
- दि.२९ जानेवारी २०२५ रोजी माजी विश्वस्त श्री.सी. पी.व्होरा यांचे दु:खद निधन झाले.
- तसेच इतर कोणीही ज्ञात अज्ञात संस्थेशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या मृतात्म्यास ईश्वर सद्गती देवो हे त्याचे चरणी आर्जव.

डोंबिवली

दिनांक - १४/०७/२०२५ **राधिका गुप्ते**

अध्यक्ष

## सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.२५००/- व अधिक देणगी देणाऱ्यांची यादी

| | नाव | रक्कम | | नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Auronpro Solutions Ltd. Navi Mumbai | १९००००० | २५ | Gaint's Group of Dombivli East | १३००० |
| २ | Evonik Catalysts India Pvt Ltd. Dombivli (E) | १५००००० | २६ | अंजली मासळी, डोंबिवली (पू) | १२००० |
| ३ | BEW Engineering Ltd., Dombivli East | २५०००० | २७ | माधव बैतुले, डोंबिवली (पू) | १२००० |
| ४ | Connectwell Industry Pvt. Ltd. Dombivli (E) | २५०००० | २८ | रमेश देवालीया, डोंबिवली (पू) | ११००० |
| ५ | उल्का शैलेंद्र गरुड, डोंबिवली -पश्चिम | १०८२०० | २९ | विनोदिनी भोसले, डोंबिवली(पू) | ११००० |
| ६ | संतोष कुमार, राजस्थान | १००००० | ३० | ललित भन्साळी, डोंबिवली (प) | १०००१ |
| ७ | शुभचिंतक | ९२०५० | ३१ | दक्ष भन्साळी, डोंबिवली (प) | १०००१ |
| ८ | महेश बुलचंदानी, ठाणे (प) | ६५७७७ | ३२ | इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली | १०००० |
| ९ | केशव पांडेय, शहाड (प) | ५५००० | ३३ | समीर सावंत, घाटकोपर (पू) | १०००० |
| १० | संगीता नेर्लेकर, डोंबिवली (पूर्व) (कै.कमल लक्ष्मण नेर्लेकर यांच्या स्मरणार्थ) | ५४००० | ३४ | श्रीकांत सुरेंद्र विचारे, डोंबिवली (प) | १०००० |
| ११ | श्री.विठ्ठल सेवा मंडळ, कल्याण (पूर्व) | ५०००० | ३५ | दित्या पुजारी, ठाकुर्ली (पू) (दित्या पुजारी हिच्या वाढदिवसानिमित्त) | १०००० |
| १२ | सरिता अरूण दातार, विले पार्ले (पूर्व) | ४९००० | ३६ | प्रमोद डिचोलकर, कल्याण (पू) | १०००० |
| १३ | अमित कुंटे, अनंतम, कल्याण | ३७००० | ३७ | सुधीर रायकर, डोंबिवली (पू) | १०००० |
| १४ | Bhimjibhai Manseta Charitable Trust, Mumbai | ३०००० | ३८ | गौरी घैसास, डोंबिवली (पू) | १०००० |
| १५. | Bhavani Chemical Ventures, Ahemdabad | २८००० | ३९ | डोंबिवली ब्राह्मण संमोहन, डोंबिवली (पू) | १०००० |
| १६ | अजय डी कुलकर्णी (श्री.भास्कर गटणे यांच्या स्मरणार्थ) | २५००० | ४० | दीपक चीरपुटकर, डोंबिवली (पू) | ९००० |
| १७ | वनिता विनय गोगटे, विले पार्ले (पूर्व) | २५००० | ४१ | भूषण हर्षे, डोंबिवली (पू) | ९००० |
| १८ | Believe Infraprojects Ltd. | २५००० | ४२ | आरती अनिल देशपांडे, कल्याण (प) (संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त) | ९००० |
| १९ | नरेंद्र फडके | २५००० | ४३ | विजय रणदिवे, डोंबिवली (प) (श्री.सुरेश रणदिवे ह्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त) | ८१८१ |
| २० | माधव आगाशे, कल्याण (प) | २०००० | ४४ | विद्याधर इनामदार, डोंबिवली (पू) | ८००० |
| २१ | नितिन खानोलकर, डोंबिवली (प) | १५००० | ४५ | अरूण घाग, डोंबिवली (पू) | ७५०० |
| २२ | बापट परिवार, डोंबिवली (पू) | १५००० | ४६ | शिवानी रावतु, बदलापूर (पू) | ७००१ |
| २३ | डॉ.प्रमोद बाहेकर, डोंबिवली (पू) | १३५६० | ४७ | दिनानाथ एकनाथ मुसळे, ठाणे (प) | ७००० |
| २४ | नीता शिरवळकर, डोंबिवली (पू) | २०१०० | ४८ | हृदयनाथ मुसळे, ठाणे (प) | ७००० |
| | | | ४९ | परीक्षित मुसळे, ठाणे (प) | ७००० |
| | | | ५० | शर्मिला ननावरे, डोंबिवली (पू) | ७००० |
| | | | ५१ | श्रद्धा विनायक नाईक, डोंबिवली (पू) | ७००० |
| | | | ५२ | गौरीश उदय धारेश्वर | ६००० |
| | | | ५३ | Galaxy IEC India Pvt. Ltd | ६००० |

## वार्षिक स्नेहसंमेलन – दि.८ फेब्रुवारी २०२५




स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांबरोबर मतिमंद विभागातील पालक आपली कला सादर करतांना




संरक्षित कर्मशाळेतील विद्यार्थी नृत्य सादर करतांना



वसतिगृहातील विद्यार्थी नृत्य सादर करतांना

## अस्तित्व माहिती पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा – दि.१७ फेब्रुवारी २०२५




**प्रमुख पाहुणे माजी खासदार आमदार मा.जगन्नाथ पाटील साहेब मार्गदर्शन करतांना.**
**सोबत व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त**



**प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे मा.जगन्नाथ पाटील साहेब यांना**
**पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देताना संस्थेचे विश्वस्त.**

## सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रु.२५००/- व अधिक देणगी देणाऱ्यांची यादी

| | नाव | रक्कम |
|---|---|---|
| ५४ | डॉ.सुरेश आडकर, डोंबिवली (पू) | ६००० |
| ५५ | प्रतिक मासळी, डोंबिवली (पू) | ६००० |
| ५६ | वनजा कुबेरा, डोंबिवली (पू) | ६००० |
| ५७ | श्रुती कुलकर्णी, ठाणे (प) | ६००० |
| ५८ | विशाल सावंत, डोंबिवली | ६००० |
| ५९ | अभिजित मधुसूदन घाणेकर, डोंबिवली (पू) | ६००० |
| ६० | वी.एल. पोतदार, गोरेगाव (पू) (कै.उमा यांच्या स्मरणार्थ) | ६००० |
| ६१ | दौलसाहेब ईनामदार, डोंबिवली (पू) | ६००० |
| ६२ | संगीता नितीन गाडे, कल्याण (पू) | ६००० |
| ६३ | विदया सदाशिव पैठणकर, कल्याण (प) (सुशीला पैठणकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ५१०० |
| ६४ | विद्यासागर नामजोशी ठाणे (प) | ५००० |
| ६५ | दामोदर | ५००० |
| ६६ | राजेंद्र जोशी, डोंबिवली (पू) (बाळकृष्ण जोशी यांच्या स्मरणार्थ) | ५००० |
| ६७ | धीरजलाल पटेल, डोंबिवली (पू) | ५००० |
| ६८ | अरूण नायर, डोंबिवली (पू) | ५००० |
| ६९ | डॉ.नंदा मेश्राम, माहीम (पू) | ५००० |
| ७० | मल्लेश बादरमेना, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७१ | सायली महेश माने, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७२ | बालाजी बेलगुनवार, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७३ | राजश्री पाटील | ५००० |
| ७४ | एकनाथ कावटकर, दादर-४०००२८ | ५००० |
| ७५ | जयंत रामचंद्र दातार, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७६ | दीपाली वाकले, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७७ | विराज रानडे, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७८ | बाळकृष्ण कामत, डोंबिवली (पू) | ५००० |
| ७९ | गौरी काटकर व नेत्रा फडके, डोंबिवली (पू) (भक्ती देशपांडे यांच्या स्मरणार्थ) | ५००० |
| ८० | दिनेश क्षीरसागर, डोंबिवली (प) | ५००० |

| | नाव | रक्कम |
|---|---|---|
| ८१ | प्रकाश कोयंडे, डोंबिवली (पू) | ५००० |
| ८२ | रिया राजेंद्र बागवे, कल्याण (पू) | ५००० |
| ८३ | भेरुलाल राठोड, डोंबिवली (पू) | ५००० |
| ८४ | सुलभा गणपत गायकवाड | ५००० |
| ८५ | दीपक गणेश बागवे, डोंबिवली (प) | ५००० |
| ८६ | आयुष राजेश ढाके, डोंबिवली (पू) | ५००० |
| ८७ | रत्ना तेलंगे, डोंबिवली (पू) | ५००० |
| ८८ | सेवा समाधान फाऊंडेशन, मालाड | ५००० |
| ८९ | सागर ताम्हाणे, डोंबिवली (पू) | ४५०० |
| ९० | अमृता कुंटे, अनंतम कल्याण | ४००० |
| ९१ | जय गणेश चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई | ४००० |
| ९२ | श्री वासुदेव /श्रीमती ज्योत्सना देसाई, धर्मादाय विश्वस्त निधी, ठाणे | ३२०० |
| ९३ | नरेन खत्री, डोंबिवली (पू) | ३०५१ |
| ९४ | सुकन्या सुधीर कुलकर्णी, डोंबिवली (पू) | ३००० |
| ९५ | प्रीती गौतम धुल्ला, डोंबिवली (प) | ३००० |
| ९६ | सुरेश बर्वे, डोंबिवली (पू) | ३००० |
| ९७ | मंदार घाडगे, डोंबिवली (पू) (दक्ष याच्या स्मरणार्थ) | ३००० |
| ९८ | गणेश ओमकार कुमावत | ३००० |
| ९९ | विनोद गवळी | ३००० |
| १०० | हसुमती साळुंखे | ३००० |
| १०१ | ज्योती कुलकर्णी | ३००० |
| १०२ | पद्माकर दाभाडे | २९८१.०६ |
| १०३ | शुभचिंतक | २९६१ |
| १०४ | विमल अमोघ परदेशी, डोंबिवली (पू) | २७०० |
| १०५ | बोरी मूस्लीम ट्रस्ट | २५०० |
| १०६ | जी.के. भारद्वाज, ठाणे (प) (कृष्णराव भारद्वाज यांचे स्मरणार्थ) | २५०० |
| १०७ | रमेश व्यंकटेश आडकर, डोंबिवली | २५०० |
| | **एकूण** | ५२,६१,८६४ |

## अहवाल वर्षात खालील व्यक्तींनी आपल्या कौटुंबिक प्रसंगाचे औचित्य साधून वसतिगृहातील मुलांना भोजनासाठी आर्थिक मदत केली.

| | नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | मनोज प्रधान, डोंबिवली (पू) | १८००० |
| २ | प्रवीण कुबेर, नव ठाकुर्ली रोड | १२००० |
| ३ | राधिका गुप्ते, डोंबिवली (पू) (वाढदिवसानिमित्त) | १२००० |
| ४ | शुभम शिवराम पाटील, डोंबिवली (पू) | १२००० |
| ५ | स्नेहलता अनंत अभ्यंकर, डोंबिवली (पू) | १०००० |
| ६ | अभिजित घाणेकर (मालती घाणेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| ७ | एस.आर.जैन ट्रस्ट, कल्याण (प) | ६००० |
| ८ | संध्या प्रभू, ठाणे (प) | ६००० |
| ९ | सचिन उतेकर, मुलुंड (पू) (साईशा उतेकर हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| १० | अंजली जोशी, ठाकूर्ली | ६००० |
| ११ | प्रियांका नाईक, डोंबिवली (पू) | ६००० |
| १२ | कोमल वाघ, डोंबिवली (पू) | ६००० |
| १३ | सविता मोकाशी, कफ परेड, मुंबई | ६००० |
| १४ | नितीन मुरलीधर मुळे, डोंबिवली (प) (कै.प्रेमा मुळे व कै.मुरलीधर मुळे यांच्या स्मरणार्थ) | ६००० |
| १५ | रोहन भडेकर, सीवूड (प) नवी मुंबई (मुलांच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| १६ | प्रज्ञा पेंडसे, डोंबिवली (पू) (प्राची पेंडसे हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| १७ | श्रुतिका हुन्नूर, डोंबिवली (प) | ६००० |
| १८ | प्रभाकर नारखेडे, मुलुंड (पू) | ६००० |
| १९ | अक्षय मुलया, ठाकुर्ली (पू) (स्वस्ती मुलया हिच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २० | त्रीकाम्जी भद्रा, मुलुंड (प) | ६००० |
| २१ | शौर्य संकपाल, ठाकुर्ली (पू) (शौर्य याच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २२ | अदिती अमोल हेदलकर, डोंबिवली (पू) (वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २३ | योगेश परमार, डोंबिवली (पू) | ६००० |
| २४ | गोपीकिशन बिर्मिवाला, डोंबिवली (पू) | ६००० |
| २५ | अक्षय के. गोठी, डोंबिवली (किशोरकुमार गोठी यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| २६ | शोभा गायकवाड, डोंबिवली (पू) (हरिश्चंद्र गायकवाड यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| २७ | अनुराधा कुलकर्णी (ध्रुवकुमार कुलकर्णी यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| २८ | रमेश जुमानी, डोंबिवली (पू) (प्रेमकुमार जुमानी ह्याच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| २९ | नेहा सत्रा, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३० | शिवानी रविराज देशमुख, डोंबिवली (पू) (रावसाहेब गायकवाड हयांच्या स्मरणार्थ) | ६००० |
| ३१ | श्रीनाथ अय्यर, कल्याण (पू) (राजलक्ष्मी अय्यर ह्यांचे स्मरणार्थ) | ६००० |
| ३२ | अपर्णा भगत, डोंबिवली (पू) (अरूणा भगत यांच्या वाढदिवसानिमित्त) | ६००० |
| ३३ | अपर्णा काळे, ठाकुर्ली (पू) | ६००० |
| ३४ | सुनिता श्रीराम शिधये, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३५ | सत्यवान गोरेगावकर, डोंबिवली (प) | ६००० |
| ३६ | धनलक्ष्मी रमेश पटेल, डोंबिवली (पू) | ६००० |
| ३७ | प्रकाश साळुंखे, अंधेरी (पू) | ६००० |
| ३८ | संगीता नेर्लेकर, डोंबिवली (पू) (मालती आणि मधुकर भातखंडे स्मरणार्थ) | ५००० |
| ३९ | श्रुतिका शेट्टी, डोंबिवली (पू) | ४००० |
| ४० | सायली उदय माळवे, डोंबिवली (प) | ४००० |
| ४१ | उषा पटेल, बदलापूर (पू) | ४००० |
| | **एकूण** | **२,७३,०००** |

# ASTITVA TRUST, DOMBIVLI (Registration No.: F/829/THANE)

## Income & Expenditure Account for the year ending 31st March, 2025

| 31/03/2024 | EXPENDITURE | 31/03/2025 | 31/03/2024 | INCOME | 31/03/2025 |
|---|---|---|---|---|---|
| 68916.00 | **To Opening Stock** | **54,458.00** | | | |
| | **To Expenditure in respect of property** | | | **By Rent** | |
| | Rates, Taxes and Cesses | | 628,752.00 | Realised | 628,752.00 |
| | Salaries | | | Accrued | |
| | Insurance | | | | |
| | Repair & Maintenance | | | | |
| | **To Estaablishment Expenses** | | | **By Interest on Bank Accounts** | |
| 976,114.47 | To Depreciation (Schedule 2) | **1,267,950.47** | 58,205.00 | Interest on SB Accounts | 73,438.00 |
| 7,367,164.76 | To Estaablishment Expenses(Sch 6) | **5,108,183.99** | 806,935.00 | Interest on Fixed Deposits | 979,771.00 |
| | **To Remuneration to Trustees** | | | | |
| | **To Amount Written off** | | - | | |
| | Bad Debts | | 6,901,565.75 | **By Donations** | 5,678,071.17 |
| | Loan Scholarship | | 35,396,565.41 | **By Gross Receipts(Sch 9)** | **36,382,639.87** |
| | Irrecoverable Debts | | 297,209.00 | **By Income from Other Sources** | 321,900.00 |
| | Other Items | | | (Schedule 7) | |
| 20,000.00 | **To Audit Fees** | **20,000.00** | - | | - |
| - | **To Miscellaneous Expenses** | - | 54,458.00 | **By Closing Stock** | 51,015.00 |
| | To Salary | | | | |
| | **To Expenditure on Objects of the Trust** | | | | |
| | a)Religious | | | | |
| 37,210,848.50 | b)Educational (Sch 9) | **34,089,924.21** | | | |
| | c)Medical Relief | | 1,559,118.57 | By Deficite carried over to | |
| | d)Relief of Poverty | | | Balance Sheet | |
| | e)Other Charitable Objects | | | | |
| 59,765.00 | To Fire and Burglary Policy | **56,814.00** | | | |
| | To Surplus carried over to | 3,518,256.37 | | | |
| | Balance Sheet | | | | |
| **45,702,808.73** | | **44,115,587.04** | **45,702,808.73** | | **44,115,587.04** |

As per our Report of even date
**For CA Shekhar S. Patwardhan**
**Partner, Membership No.106547**
**UDIN:** 25106547BMOKUN6983

SD/-
**RADHIKA GUPTE**
(President)

SD/-
**MANOJ PRADHAN**
(Secretary)

SD/-
**PRAVIN KUBER**
(Treasurer)

Date : 14.07.2025
Place : Dombivli

# ASTITVA TRUST, DOMBIVLI (Registration No.: F/829/THANE)

## Balance Sheet as on 31st March, 2025

| 31/03/2024 | FUNDS & LIABILITIES | RS. | 31/03/2025 | 31/03/2024 | PROPERTY & ASSETS | RS. | 31/03/2025 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Trust Funds and Corpus:-** | | | | **Fixed & Movable Assets** | | |
| 3,938,544.00 | Balance as per last Balance Sheet | **3,938,544.00** | | | (As per Schedule 2) | | |
| | Additions During the Year | - | **3,938,544.00** | 20,559,008.72 | Land and Building | 21,534,724.71 | |
| | | | | 1,373,804.86 | Plant and Machinery | 3,057,359.33 | |
| | **Other Earmarked Funds** | | | 2,154,396.71 | Furniture & Fixture | 2,555,733.30 | **27,147,817.83** |
| 16,770,000.00 | **Building Fund** | | **16,770,000.00** | | | | |
| | | | | | **Investments** | | |
| | | | | | | - | |
| | | | | 14,002,001.00 | Fixed Deposit with SBI | **16,405,917.00** | |
| | | | | 5,000.00 | Investment in Shares | 5,000.00 | **16,410,917.00** |
| 878,887.00 | Govt. Grants for Capital Assets | | **878,887.00** | | | | |
| | (CCTV) | | | | **Deposits** | | |
| | **Liabilities** | | | 15,710.00 | Gas | 15,710.00 | |
| 2,862,503.00 | Salary Payable (Schedule 1) | **2,447,296.00** | | 4,300.00 | Telephone | 4,300.00 | |
| 20,000.00 | Audit Fee Payable | **20,000.00** | | 10,340.00 | Water | 10,340.00 | |
| 129,500.00 | Hostel Mess Deposits | **129,500.00** | | 10,560.00 | M.S.E.B. | 57,300.00 | |
| 213,117.00 | Staff Security Deposits | **220,317.00** | | 1,000.00 | PCO Deposit | 1,000.00 | |
| 200,000.00 | Sanman Deposit | 150,000.00 | 2,967,113.00 | 87,450.00 | Security Deposit | 87,450.00 | **176,100.00** |
| | | | | | **Advances** | | - |
| | | | | 600,000.00 | To Contractors (LIFT) | | - |
| | | | | 7,000.00 | To Transfer to OT A/c/SWS VF | - | - |
| 26,676,148.27 | **Income & Expenditure A/C** | | | 785,624.00 | **Work in Progress (Lift A/C** | | - |
| | Balance as per last Balance Sheet | **26,676,148.27** | | | **Income Outstanding** | | |
| | Add: Surplus during the year | **3,518,256.37** | | 54,458.00 | Closing Stock (Schedule 3) | **51,015.00** | |
| | Less: Prior Period Items | - | 30,194,404.64 | 6,333,585.00 | Income Outstanding | **6,093,569.00** | |
| | | | | | (Schedule 4) | | |
| | | | | 483,516.00 | Other Income(Accrued Interest | **650,881.00** | |
| | | | | 165,199.00 | Tax Deducted at Source | **179,664.00** | **6,975,129.00** |
| | | | | | **Cash & Bank Balances:-** | | |
| | | | | **5,011,313.25** | Bank Balances (Schedule 5) | **3,969,103.81** | |
| | | | | 24,432.73 | Cash in Hand | **69,881.00** | **4,038,984.81** |
| **51,688,699.27** | | | **54,748,948.64** | **51,688,699.27** | | | **54,748,948.64** |

As per our Report of even date
**For CA Shekhar S. Patwardhan**
**Partner, Membership No.106547**
**UDIN:** 25106547BMOKUN6983

SD/-
**RADHIKA GUPTE**
(President)

SD/-
**MANOJ PRADHAN**
(Secretary)

SD/-
**PRAVIN KUBER**
(Treasurer)

Date : 14.07.2025
Place : Dombivli

अस्तित्व माहिती पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा - दि.१७ फेब्रुवारी २०२५



संस्थापक अध्यक्ष डॉ.एस. व्ही. आडकर यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ त्यांना सन्मानित करतांना शाळेचे कर्मचारी



डॉ.आडकरांच्या वाढदिवसानिमित्त डॉक्टरांना पुष्पगुच्छ देतांना
निमंत्रित स्वामी विवेकानंद शाळेचे ट्रस्टी श्री.दांडेकर व डॉक्टरांचे मित्र आणि रामदासस्वामी मठ, खातगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहिल्याबाईनगर (अहमदनगर) श्री पूज्य मोहनबुवा रामदासी स्थापितचे विश्वस्त श्री.गुमास्ते

अस्तित्व संस्थेच्या कार्यालयाचे रिनोव्हेशन दि.३० मार्च २०२५



अस्त्वि संस्थेचे कार्यालय



कार्यालयाचे उद्घाटन करतांना संस्थेचे विश्वस्त व कर्मचारी वृंद



कार्यालयात समस्त विश्वस्त व कर्मचारी वृंद

**MSVP & ASSOCIATES**
CHARTERED ACCOUNTANTS

# REPORT OF THE AUDITOR

**We have examined the attached Balance Sheet of ASTITVA TRUST as on 31st March 2025 and the Income and Expenditure Account for the year ended 31st March 2025 as per the provisions of THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT, 1950 and report that: -**

1. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.

2. In our opinion and to the best of our information and explanation given to us, the said accounts are in agreement with the books of accounts and give a true and fair view : -

   a) In case of The Balance Sheet, of the State of affairs of the Trust as on 31st March, 2025.

   AND

   b) In case of Income and Expenditure account, of the Surplus of the Trust for the year ended 31st March, 2025.

**FOR MSVP & ASSOCIATES.**
**CHARTERED ACCOUNTANTS**

**PLACE: DOMBIVLI**
**DATED: 14-07-2025**

**CA SHEKHAR S. PATWARDHAN**
**Partner**
**M. No. 106547**
**UDIN:25106547BMOKUN6983**

Report of an auditor relating to accounts audited under sub-section 33 & 34 and rule 19 of the Maharashtra Public Trusts Act.1950

**Registration No.:- F/829/THANE**
**Name of the Public Trust.:- ASTITVA TRUST, DOMBIVLI**
**For the year ending 31ST MARCH, 2025**

| | |
|---|---|
| a) Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions f the Act and the rules: | YES |
| b) Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | YES |
| c) Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts | YES |
| d) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him. | YES |
| e) Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly compiled with | YES |
| f) Whether the Manager or Trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him. | YES |
| g) Whether any property or funds of the trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust | NO |
| h) The amounts of outstanding for more than one year and the amounts written off, if any: | NIL |
| i) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000/- | YES |
| j) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35 | NO |
| k) Alienation's, if any, of the immovable property contrary to the provisions of section 36 which have come to the notice of the auditor. | NO |
| l)All cases of irregular, illegal or improper expenditure, or failure or omission to recover Moneys or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property thereof, and whether such expenditure, failure,omission,loss or waste was caused in consequences of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust. | NIL |
| m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16A | YES |
| n) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained | YES |
| o) Whether the meetings are held regularly as provided in such Instrument | YES |
| p) Whether the minute books of the proceedings is maintained | YES |
| q) Whether any of the trustees has any interest in the investment of the trust | NO |
| r) Whether any of the trustees is a debtors or creditors of the trust | NO |
| s) Whether the irregularituies pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly compiled with by the trustees during the period of audit. | YES |
| t) Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | NO |

**For MSVP & Associates.**
**Chartered Accountants**

**For CA Shekhar S. Patwardhan**
**Partner,**
**Membership No.106547**
**UDIN:** 25106547BMOKUN6983
Date : 14.07.2025




**अस्तित्व माहिती पुस्तिकेचे<br>प्रकाशन करतांना मा. जगन्नाथ पाटील साहेब,<br>संस्थापक अध्यक्ष डॉ.एस.व्ही. आडकर,<br>अध्यक्ष श्रीमती राधिका गुप्ते, सचिव श्री.मनोज प्रधान,<br>विश्वस्त श्री.दिलीप भामरे**

# ।। अस्तित्व ।।

## प्रल्हादराय कागझी इन्स्टिट्यूट फॉर हॅन्डिकॅप्ड

प्लॉट नं. ८, फेज – १, स्टेट बँक रोड, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी : ९८३३५५६९८१

